9c

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**प्रस्तावना**

**विषय:-** प्रारूप सुधारित विकास योजना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका जि. ठाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (३) अन्वये नियोजन समितीस मुदतवाढ देणेबाबत ...

**संदर्भ:-** सर्व नियोजन समिती सदस्य यांचा दि. १२/०९/२०२४ रोजीचा विनंती अर्ज.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) मधील तरतूदीनुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीची प्रारुप विकास योजना तयार करुन त्यासंबधीची सूचना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/सूचना धारकांना सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये सूचना क्र.तांत्रिक/संसनर/वियोविघ/भिनिश मनपा/३६४, दि. २४/०१/२०२४ अन्वये गठीत झालेली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीची नियोजन प्राधिकरणास प्राप्त हरकती/सूचनांवर सुनावणी देऊन अहवाल सादर करण्याची मूळ मुदत लोकसभा निवडणुक, २०२४ व महाराष्ट्र विधान परिषदेसाठी ०२ पदवीधर आणि ०२ शिक्षक मतदार संघाची निवडणुक आचारसंहीतेचा कालावधी वगळता दि. १२/०७/२०२४ पावेतो होती.

उक्त नियोजन समितीने प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकत/ सुचनांची संख्या विचारात घेऊन त्यांचेकडील दि.१२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी २ महिन्याची मुदतवाढ पत्रात नमूद कारणास्तव मंजूर होण्यास विनंती केलेली त्यास मा. प्रशासकिय ठराव क्र.४५५ दि.१६/०७/२०२४ अन्वये दि. १३/०७/२०२४ ते दि. १२/०९/२०२४ पर्यंत मुदत वाढीस मंजुरी देऊन व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा आदेश क्र.तांत्रिक/ससंनर/वियोविघ/भिनिश मनपा/२५२९९ /२०२४, दि. १६/०७/२०२४ अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.

आता उक्त नियोजन समितीने, पत्रात नमूद कारणास्तव त्यांचेकडील दि. १२/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. १३/०९/२०२४ ते दि.१२/१०/२०२४ पर्यंतची १ महिन्याची मुदतवाढ मंजूर होण्यास विनंती केलेली त्यास मा. प्रशासकिय ठराव क्र.५५५ दि.१३/०९/२०२४ अन्वये दि.१३/०९/२०२४ ते दि. ३०/०९/२०२४ पर्यंतच्या मुदतवाढीस मंजुरी देऊन व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा आदेश क्र. जा.क्र.तांत्रिक /ससंनर/वियोविघ/भिनिशमनपा/२५२७६/२०२४, दि. १३/०९/२०२४ अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र दि.२५/०९/२०२४ रोजी झालेल्या चर्चेनुसार नियोजन समिती सदस्यांनी पत्रात नमूद कारणास्तव त्यांचेकडील दि. १२/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपेक्षील्यानुसार दि. ३०/०९/२०२४ पासून पुढे अजुन काही दिवसांची मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे दिसुन आले आहे.

सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. पाहत आहेत. विषयांकित नमुद कलम २८ (३) अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ५८७          दि.२६/०९/२०२४

१) नियोजन समितीने पत्रात नमूद केलेली कारणमिमांसा व त्यावर विभागाकडुन प्रस्तावित करण्यात आल्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रारुप सुधारित विकास योजना कार्यवाही

अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या नियोजन समितीला मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक असल्याने उक्त नियोजन समितीला प्राप्त हरकती/सूचनांची सुनावणी घेऊन अहवाल सादर करण्यासाठी, कलम २८(३) अन्वये दि. ०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४ पर्यंतची मुदतवाढीस या ठरावाव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने पुढिल प्रशासनिक कार्यवाही करण्यासाठी आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी नि. श. महानगरपालिका,
भिवंडी.